सांग ना रे मना

चित्रपट ः झेंडा

गायक ः स्वप्निल बांदोडकर, निहिरा जोशी

गीत ः गुरू ठाकुर    संगीत ः अवधूत गुप्ते

अंतरी वाजती प्रीतीची पैंजणे
आणि धुंदावती भाबडी लोचने
होतसे जीव का घाबरा सांग ना
सांग ना रे मना   सांग ना रे मना
सांग ना रे मना सांग ना रे मना

श्वास गंधाळती शब्द भांबावती
रोमरोमातली कंपने बोलती
मोहरे मोहरे पाकळी पाकळी
भारलेल्या जीवा आवरावे कीती
का अशा जागल्या सांग संवेदना
सांग ना रे मना   सांग ना रे मना
सांग ना रे मना   सांग ना रे मना

हे नवे भास अन् हया नव्या चाहुली
ऐकु ये कोठूनी साद ही मलमली
गोठले श्वास अन् स्पंदने थांबली
हे शहारे जणू रेशमाच्या जुडी
आज ओथंबल्या का अशा भावना
सांग ना रे मना  सांग ना रे मना
सांग ना रे मना  सांग ना रे मना